# Punyanagari

## Cholamandalam Investment & Finance Co.Ltd

**Date: 17/08/2015 | Edition: Mumbai | Page: 9 | Source: Bureau | Clip size (cm): W: 11 H: 6**




# चोलामंडलम इन्व्हेस्टमेंटच्या नफ्यात वाढ

**मुंबई** : चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेडच्या संचालक मंडळाने पहिल्या तिमाही ३० जून २०१५ रोजीसाठीचा वित्तीय निकाल संमत करून त्यांना हिशेबात समाविष्ट करून घेतले. यामध्ये आर्थिक वर्ष २०१६च्या पहिल्या तिमाहीत कर वजावटीपूर्वीचा नफा १७१ कोटी रुपये झाला आहे. गेल्या वर्षीच्या प्रथम तिमाहीच्या तुलनेत २१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्याचबरोबर नेट इन्कम मार्जिन (एनआयएम)मध्ये २५ टक्क्यांनी वाढ झाली असून हिशेब बंद करताना क्लोझिंग असेटमध्ये १३ टक्क्यांनी आरोग्यदायी वाढ नोंदवली आहे. या तिमाहीतील कर वजावटीनंतरचा नफा ११० कोटी रुपयांवर पोहचला असून ही वाढ सुमारे १८ टक्के इतकी आहे. जून २०१५ मध्ये क्रिसिलने कंपनीच्या दीर्घकालीन ऋण साधनांवरील रेटिंग उंचावून ते एए-/पॉझिटिव्हवरून एए/स्टेबल केले आहे.